मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विसर्जनानंतरही महापालिकेची 'स्वच्छता मोहीम' धडाक्यात!

## घाट-मिरवणूक मार्गांवर ३ हजारांहून अधिक सफाई सेवकांची धावपळ; २९४.६५५ मेट्रिक टन संकलन

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील विसर्जन घाट तसेच मिरवणूक मार्गांवर स्वच्छता, कचरा संकलन आणि निर्माल्य विलगीकरणाची विशेष यंत्रणा राबविण्यात आली. २२ ते २५ सप्टेंबर या चार दिवसांत तब्बल ६५०० मेट्रिक टन कचरा संकलित करण्यात आला. यासाठी सुमारे तीन हजारांहून अधिक सफाई सेवक प्रत्यक्ष मैदानात कार्यरत होते.**





विसर्जन घाट आणि मिरवणूक मार्गांवर निर्माण होणारा कचरा तातडीने हटविण्यासाठी आरोग्य विभागाच्या स्वच्छता पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. विसर्जनाच्या दिवशी मोठी गर्दी असतानाही स्वच्छता पथकांनी सातत्याने काम करून घाट परिसर आणि मिरवणूक मार्ग स्वच्छ ठेवले.

दरम्यान, गणेशमूर्तींना वाहण्यात आलेली फुले, हार तसेच पूजासाहित्यापासून निर्माण झालेले २९४.६५५ मेट्रिक टन निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करण्यात आले. निर्माल्य कचऱ्यात मिसळू नये, यासाठी विसर्जन घाटांवर स्वतंत्र निर्माल्य संकलन आणि विलगीकरणाची व्यवस्था आरोग्य विभागाकडून करण्यात आली होती.

विसर्जनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही स्वच्छता सेवकांनी तत्परतेने काम सुरू ठेवत घाट परिसर तसेच मिरवणूक मार्गांची स्वच्छता केली. त्यामुळे विसर्जनानंतरची स्वच्छता व्यवस्था सुरळीत आणि प्रभावीपणे राबविण्यात आली.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, "गणेशोत्सव आणि विसर्जन काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आरोग्य विभागाची पथके सातत्याने कार्यरत होती. घाट परिसरात नागरिकांना स्वच्छतेच्या सुविधा तत्परतेने मिळाव्यात, यासाठी स्वच्छता पथके प्रत्यक्ष ठिकाणी कार्यरत राहिली. यापुढे ही नागरिकांनीही आपला कचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता त्याचे योग्य विलगीकरण करून महापालिकेच्या संकलन व्यवस्थेकडे द्यावा. शहराची स्वच्छता राखणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांनी महापालिकेच्या स्वच्छता यंत्रणेला दिलेल्या सहकार्यामुळे विसर्जनानंतरची स्वच्छता व्यवस्था सुरळीतपणे राबविण्यास मदत झाली. शहराची स्वच्छता कायम राखण्यासाठी यापुढेही नागरिकांनी महापालिकेच्या स्वच्छता यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

> "गणेश विसर्जनाच्या कालावधीत नागरिकांनी स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणेला दिलेले सहकार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. अनेक नागरिकांनी निर्माल्य स्वतंत्रपणे जमा करून कचरा योग्य ठिकाणी देण्यास प्राधान्य दिल्यामुळे घाट परिसर आणि मिरवणूक मार्गांवरील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यास मदत झाली. स्वच्छतेबाबत नागरिकांनी दाखविलेली ही जागरूकता आणि सहकार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. त्याचबरोबर, मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला कचरा तातडीने संकलित करून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत राहिलेल्या सर्व सफाई सेवक व आरोग्य विभागाच्या पथकांचे काम कौतुकास पात्र असून, नागरिक आणि महापालिका यंत्रणेच्या समन्वयातून स्वच्छतेची ही व्यवस्था प्रभावीपणे राबविता आली."
>
> --डॉ. विजय सूर्यवंशी,
> आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# दिघीत 'घरफोडी'चा धक्कादायक पर्दाफाश; १४ लाखांचे दागिने घरातच लपवले!

» पिंपरी | प्रतिनिधी

**दिघी परिसरातील घरफोडीच्या कथित प्रकाराचा पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-३ ने अवघ्या १२ तासांत छडा लावला. या तपासात तब्बल १३ लाख ९८ हजार ९७८ रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने घरातूनच हस्तगत करण्यात आले. विशेष म्हणजे, बाहेरील व्यक्तीने घरफोडी करून दागिने चोरल्याचा संशय असताना तपासाची दिशा वेगळीच निघाली. पती दागिने विकून नवीन घर खरेदी करण्याच्या तयारीत असल्याने ते विकले जाऊ नयेत, या भीतीपोटी पत्नीनेच दागिने घरात लपवून ठेवल्याचे पोलिस तपासात समोर आले.**



दिघी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास सुरू केला. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली समांतर तपासाची चक्रे फिरविण्यात आली.

गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून परिसरातील नागरिक, शेजारी आणि रहिवाशांकडे सखोल चौकशी केली. मात्र, तपासादरम्यान बाहेरील कोणतीही संशयास्पद व्यक्ती इमारतीमध्ये आल्याचे किंवा घरफोडीशी संबंधित हालचाल केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले नाही.

त्यामुळे पोलिसांनी उपलब्ध पुरावे आणि घटनाक्रमाचा बारकाईने अभ्यास करण्यास सुरुवात केली. तपासाची दिशा बदलत असताना पोलिसांनी फिर्यादीच्या पत्नीला विश्वासात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान पोलिसांनी विचारलेल्या प्रश्नांमधून तसेच घटनाक्रमातील विसंगतींचे विश्लेषण केल्यानंतर या प्रकरणातील महत्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले.

# एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये गणेशोत्सव उत्साहात!

## विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारून दिला संवर्धनाचा संदेश!






» पिंपरी | प्रतिनिधी

**येथील आळंदी रस्त्यावरील एस.पी.जी. इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये गणेश चतुर्थीचा उत्सव अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. उत्सवाच्या मुख्य दिवशी सुट्टी असल्याने शाळेच्या प्रशासकीय विभागाच्या सक्रिय संकल्प पांडुरंग गवळी आणि प्राचार्य प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन मा. नाना पांडुरंग गवळी व मा. सुनीतामाई पांडुरंग गवळी यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच मा. स्वप्नील पांडुरंग गवळी, मा. कोमल पांडुरंग गवळी आणि मा. संकल्प पांडुरंग गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. विधीवत पूजा, आरती आणि प्रार्थनेच्या माध्यमातून सर्वांच्या सुख-समृद्धीसह शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली.**

या गणेशोत्सवाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी सामाजिक भान जपत राबवलेला पर्यावरणपूरक उपक्रम ठरला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'इ' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक ५ अंतर्गत, 'माझी वसुंधरा ७.०' आणि 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' या अभियानांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेला प्रतिसाद देत शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः पर्यावरणपूरक गणेश प्रतिमा साकारून समाजप्रबोधन केले.

महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमाद्वारे, उत्सव साजरा करताना निसर्गाचे रक्षण करणे किती गरजेचे आहे, हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दिला. विद्यार्थ्यांमधील ही जाणीव कुटुंब आणि संपूर्ण समाजापर्यंत पोहोचून पर्यावरण संवर्धनाला मोठी गती मिळेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

उत्सवाची सांगता अत्यंत जल्लोषात आणि भावपूर्ण वातावरणात झाली. ढोल-ताशांच्या गजरात शाळेच्या आवारातून बाप्पाची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!" या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. विसर्जनानंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या संपूर्ण उत्सवातून विद्यार्थ्यांना भक्ती, एकता, सहकार्य आणि संस्कृतीच्या जपणुकीचे मोलाचे धडे मिळाले. हा उत्सव आणि जनजागृती उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेचा प्रशासकीय विभाग, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# थेरगावात 'डीजे-डॉल्बी'ला हद्दपार करत गणेशोत्सवाचा दणदणीत आदर्श!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सव म्हटले की डीजे-डॉल्बीचा दणदणाट, मोठ्या आवाजातील संगीत आणि गर्दी असे चित्र अनेकदा पाहायला मिळते. मात्र, थेरगावमधील वनदेव आनंदवन मित्र मंडळाने यंदा या प्रचलित पद्धतीला फाटा देत परंपरा, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा गणेशोत्सव साजरा केला. स्थायी समिती सभापती तथा मंडळाचे संस्थापक अभिषेक बारणे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला हा उत्सव विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी लक्षवेधी ठरला.**



> "गणेशोत्सव हा केवळ आनंद साजरा करण्याचा सण नसून तो समाजाला जोडण्याचे आणि उत्तम संस्कार रुजवण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. आजच्या तरुणांनी आणि मंडळांनी डिजेच्या संस्कृतीतून बाहेर पडून आपल्या समृद्ध परंपरेकडे आणि समाजहिताच्या कार्याकडे वळणे गरजेचे आहे. बाप्पाच्या कृपेने आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यंदाचा हा स्तुत्य उपक्रम यशस्वी होऊ शकला, याचे आम्हास विशेष समाधान आहे."
>
> – अभिषेक बारणे, संस्थापक – वनदेव आनंदवन मित्र मंडळ, थेरगाव.

यंदाच्या गणेश विसर्जन सोहळ्यात मंडळाने ध्वनीप्रदूषण टाळण्यावर विशेष भर दिला. डीजे-डॉल्बीचा दणदणाट न करता पारंपरिक वाद्यांच्या तालावर भक्तिमय वातावरणात गणपती बाप्पाला निरोप देण्यात आला. त्यामुळे उत्सवाचा जल्लोष कायम ठेवतानाच सामाजिक जबाबदारीचे भानही जपण्यात आले. या सोहळ्याला प्रसिद्ध सिनेअभिनेत्री उर्मिला कानेटकर, पूर्णिमा डे, स्नेहलता माघाडे तसेच प्रसिद्ध नृत्यांगना प्रियांका जाधव यांनी उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीमुळे गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

विसर्जन सोहळ्याचे सर्वाधिक आकर्षण ठरले ते महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या माता जोगेश्वरी आणि काळभैरवनाथ यांच्या विवाह सोहळ्याचा भव्य-दिव्य जिवंत पौराणिक देखावा. या देखाव्याचे विलोभनीय सादरीकरण पाहण्यासाठी तसेच बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी परिसरातील तब्बल १५ ते २० हजार नागरिकांनी गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, पौराणिक प्रसंगांचे सादरीकरण आणि सांस्कृतिक वातावरणामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. पारंपरिक वाद्यांच्या तालावर नागरिकांनी ठेका धरत बाप्पाला निरोप दिला.

मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रमही राबविण्यात आले. त्यामध्ये 'आरोग्याचा श्रीगणेशा' हा विशेष आरोग्य तपासणी उपक्रम महत्त्वाचा ठरला. या उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी बाह्यरुग्ण विभागाची तपासणी, रक्तदाब तपासणी, रक्तातील साखरेची तपासणी, औषधोपचार तसेच असंसर्गजन्य आजारांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांबाबत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले. याशिवाय आभा कार्ड आणि आयुष्मान कार्ड यासंदर्भातही नागरिकांना माहिती देण्यात आली. या आरोग्य उपक्रमाचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला.

गणेशोत्सवाच्या काळात लहान मुलांनाही उत्सवाचा आनंद घेता यावा आणि त्यांच्यामध्ये सांस्कृतिक उपक्रमांविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी मंडळाच्या वतीने विशेष 'बालजत्रे'चे आयोजन करण्यात आले होते. विविध मनोरंजनात्मक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे बालगोपाळांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. त्यामुळे गणेशोत्सवात केवळ धार्मिक कार्यक्रमांऐवजी सर्व वयोगटातील नागरिकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न मंडळाकडून करण्यात आला.

दरम्यान, विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होणार असल्याने वाहतूक व्यवस्थेचेही नियोजन करण्यात आले होते. मिरवणुकीदरम्यान वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाच्या सहकार्याने विशेष व्यवस्था करण्यात आली. नागरिकांच्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊनही मिरवणूक शिस्तबद्ध पद्धतीने पार पडण्यास मदत झाली.

# विसर्जन मिरवणुकीनंतर रस्ते झाले चकाचक!

## घनकचरा व्यवस्थापन विभागाने शहरातील विविध रस्त्यांवरून ९१८ टन कचरा संकलन

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**शहरातील वैभवशाली गणेशोत्सवाची सांगता शुक्रवार आणि शनिवार अशा दोन दिवसांच्या विसर्जन मिरवणुकीने मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात झाली. लाखो भाविकांच्या गर्दीने गजबजलेल्या शहरातील प्रमुख रस्त्यांवर मिरवणूक संपल्यानंतर काही तासांतच पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने स्वच्छता मोहीम हाती घेतली. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीनंतर शहरातील प्रमुख मार्ग पुन्हा स्वच्छ आणि चकाचक करण्यासाठी महापालिकेने मोठी मनुष्यबळ आणि वाहनांची यंत्रणा तैनात केली होती. या विशेष स्वच्छता मोहिमेदरम्यान विविध मिरवणूक मार्गांवरून तब्बल ९१८ टन ५३७ किलो कचरा संकलित करण्यात आला.**



गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी महापालिकेने यंदा विविध स्तरांवर नियोजन केले होते. मिरवणूक मार्गावर मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होत असल्याने या मार्गावर कचरा साचण्याची शक्यता लक्षात घेऊन घनकचरा व्यवस्थापन विभागाने स्वतंत्र स्वच्छता यंत्रणा उभी केली होती. मिरवणूक सुरू असतानाच आणि मिरवणूक संपल्यानंतर तातडीने स्वच्छता करण्यासाठी तब्बल ४ हजार १७९ सफाई सेवक तैनात करण्यात आले होते. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसोबत विविध स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवकही या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

विसर्जन मिरवणुकीनंतर लक्ष्मी रोड, टिळक रोड, कुमठेकर रोड, नारायण पेठ रोड, बाजीराव रोड, शिवाजी रोड, अलका चौक, खंडुजी बाबा चौक, कर्वे रोड, जंगली महाराज रोड, सेनापती बापट रोड, गणेशखिंड रोड, फर्ग्युसन महाविद्यालय रोड, प्रभात रोड, भांडारकर रोड आणि पुणे-मुंबई रोड या प्रमुख मार्गांवर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला कचरा तातडीने हटवून रस्ते वाहतुकीसाठी आणि नागरिकांच्या वापरासाठी स्वच्छ करण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेत संकलित करण्यात आलेल्या ९१८ टन ५३७ किलो कचऱ्यामध्ये ५४६ टन ३५४ किलो ओला कचरा आणि ३७२ टन १८४ किलो सुका कचरा होता. याशिवाय गणेश मंडळांच्या सजावटीसाठी वापरण्यात आलेले साहित्यही मोठ्या प्रमाणावर जमा झाले. तब्बल १८ टन ९१० किलो सजावटीचे साहित्य संकलित करण्यात आले. मिरवणूक मार्गांवर भाविक आणि सहभागी नागरिकांकडून टाकल्या गेलेल्या २ टन १५३ किलो चपला-बुटांचे देखील संकलन करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी महापालिकेने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ उपलब्ध करून दिले होते. या संपूर्ण नियोजनासाठी १६ वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, १६१ आरोग्य निरीक्षक, २९२ मुकादम आणि ४ हजार १७९ कायमस्वरूपी सफाई सेवक कार्यरत होते. क्षेत्रीय कार्यालयांच्या मागणीनुसार स्वच्छता आणि कचरा वाहतुकीसाठी एकूण १ हजार ६७० वाहने उपलब्ध करून देण्यात आली होती.

विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणावर नागरिक रस्त्यावर उतरल्याने खाद्यपदार्थांचे अवशेष, प्लास्टिक, कागद, फुलांचे साहित्य, सजावटीचे साहित्य आणि इतर प्रकारचा कचरा रस्त्यांवर जमा झाला होता. मात्र, महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी मिरवणूक मार्गावर सातत्याने काम करत हा कचरा हटविला. मिरवणूक संपल्यानंतरही स्वच्छता पथकांनी रात्री उशिरापर्यंत आणि त्यानंतरही काम सुरू ठेवत प्रमुख रस्ते स्वच्छ करण्यावर भर दिला.

विशेष म्हणजे, कचऱ्याचे संकलन करताना ओला आणि सुका कचरा वेगळा करण्यासह सजावटीचे साहित्य आणि चपला-बूट यांचेही स्वतंत्र संकलन करण्यात आले. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीनंतर मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यास महापालिकेला मदत झाली. स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत स्वयंसेवी संस्थांच्या स्वयंसेवकांनीही सहभाग घेतल्याने मोठ्या प्रमाणावरील कचरा कमी वेळेत हटविणे शक्य झाले.

# नीरा बाजारपेठेत चप्पल दुकानाच्या गोडाऊनला भीषण आग; जीवितहानी टळली!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पुरंदर तालुक्यातील नीरा शहराच्या गजबजलेल्या लक्ष्मी रोडवरील गौरी शू पॅलेसच्या वरच्या मजल्यावरील चप्पल दुकानाच्या गोडाऊनला रविवारी सकाळी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात चप्पल, पुठ्ठे आणि इतर ज्वलनशील साहित्य साठवून ठेवण्यात आले होते. त्यामुळे आग लागल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच आगीने उग्र रूप धारण केले. गोडाऊनमधून बाहेर पडणारे काळे धुराचे लोट आणि भडकलेल्या आगीच्या ज्वाळा पाहून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, ज्युबिलंट इनग्रेव्हीया कंपनीच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत सुमारे तासभर शर्थीचे प्रयत्न केल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.**




रविवारी सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास गौरी शू पॅलेसच्या वरच्या मजल्यावरील गोडाऊनमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर येत असल्याचे लक्ष्मी रोडवरील स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. सुरुवातीला नेमके काय घडले हे स्पष्ट नसताना काही वेळातच गोडाऊनमध्ये आग लागल्याचे समोर आले. आग वेगाने वाढत असल्याने परिसरातील युवकांनी आणि नागरिकांनी सुरुवातीला स्वतःच्या पातळीवर आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर चप्पल, पुठ्ठे आणि अन्य ज्वलनशील साहित्य असल्याने आगीवर नियंत्रण मिळविणे कठीण झाले.

काही वेळातच आगीच्या ज्वाळांनी उग्र रूप धारण केले. गोडाऊनमधून मोठ्या प्रमाणावर धूर बाहेर पडत होता. आग वाढत गेल्याने शेजारील दुकाने आणि रहिवासी इमारतींनाही धोका निर्माण झाला. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून काही दुकानदारांनी आपली दुकाने बंद केली आणि सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. परिसरातील नागरिकांमध्येही घबराट निर्माण झाली. आग आणखी पसरू नये आणि कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी वीज वितरण कंपनीकडून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील राहुल शिंदे यांनी तातडीने ज्युबिलंट इनग्रेव्हीया कंपनीच्या अग्निशमन दलाला तसेच नीरा पोलीस दूरक्षेत्राला माहिती दिली. माहिती मिळताच ज्युबिलंटचे फायर युनिट घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेत तातडीने आग विझविण्याची मोहीम सुरू केली. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात ज्वलनशील साहित्य असल्यामुळे आग सतत भडकत होती. त्यामुळे अग्निशमन कर्मचाऱ्यांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते.

अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी विविध बाजूंनी पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळविण्यास सुरुवात केली. गोडाऊनमधील साहित्यामुळे काही वेळ आगीच्या ज्वाळा पुन्हा भडकत होत्या. मात्र, अग्निशमन कर्मचाऱ्यांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवत सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. अखेर सुमारे एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले. त्यामुळे आग शेजारील दुकानांमध्ये किंवा रहिवासी भागात पसरण्याचा धोका टळला.

# रीलस्टार दिव्या शिंदेला अटक; अधिकाऱ्याच्या घरात घुसून मारहाण!

## खंडणीच्या मागणीने पुण्यात खळबळ; दिव्यासह ८ ते १० साथीदारांविरुद्ध गुन्हा!

पिंपरी | प्रतिनिधी

**सोशल मीडिया रीलस्टार दिव्या शिंदे हिला काळेपडळ पोलिसांनी पाच लाख रुपयांच्या खंडणीच्या मागणीसह निवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्याच्या घरात घुसून मारहाण केल्याच्या आरोपावरून अटक केली आहे. या प्रकरणात दिव्या शिंदे हिच्यासह तिच्या आठ ते दहा साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केलेल्या दिव्या शिंदेला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तिला ३० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे पुण्यात सोशल मीडिया प्रसिद्धीचा वापर करून धमकी आणि खंडणी मागितल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.**





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिव्या शिंदे ही सिंहगड रस्ता परिसरातील सनसिटी रस्त्यावर राहते. या प्रकरणातील तक्रारदार पुणे कटक मंडळातील निवृत्त मुख्य वैद्यकीय अधिकारी आहेत. ते २०२१ मध्ये सेवेतून निवृत्त झाले असून, सध्या एका स्वयंसेवी संस्थेशी संबंधित आहेत. या संस्थेच्या वतीने १ ते ३ सप्टेंबरदरम्यान 'कला आविष्कार महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी दिव्या शिंदे हिला संस्थेकडून कोणतेही अधिकृत निमंत्रण देण्यात आले नव्हते. मात्र, कार्यक्रमाची समाजमाध्यमांवर प्रसिद्धी केल्याचे सांगत तिने तक्रारदारांशी संपर्क साधला. यानंतर त्यांच्याकडे पैशांची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. सुरुवातीला समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला; मात्र पुढे या प्रकरणाला धमकी आणि खंडणीच्या मागणीचे स्वरूप आल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

दरम्यान, १७ सप्टेंबर रोजी दिव्या शिंदे आणि तिचे काही साथीदार तक्रारदारांच्या घरी गेले. त्या वेळी तक्रारदार घरी उपस्थित नव्हते. मात्र, त्यांच्या पत्नी आणि मुलाला दिव्या शिंदे व तिच्या साथीदारांनी दमदाटी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतरही संबंधितांकडून तक्रारदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू होता.

त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी दिव्या शिंदे हिने तक्रारदारांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. त्यांना लष्कर परिसरातील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये बोलावून घेण्यात आले. तेथे त्यांना धमकावून पाच लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे तक्रारदारांवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

मात्र, प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. २४ सप्टेंबर रोजी रात्री तक्रारदार आपल्या घरी एकटे असताना दिव्या शिंदे आणि तिचे साथीदार त्यांच्या निवासस्थानी पोहोचले. त्यांनी घरात प्रवेश करून तक्रारदाराला मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर तक्रारदारांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

तक्रारीच्या आधारे काळेपडळ पोलिसांनी दिव्या शिंदे हिला अटक केली असून, तिच्यासोबत असलेल्या आठ ते दहा साथीदारांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अमित शेटे करत आहेत. पोलिसांकडून या प्रकरणातील इतर आरोपींची भूमिका, खंडणीच्या मागणीमागील नेमका उद्देश आणि घटनेशी संबंधित इतर बाबींचा तपास केला जात आहे. न्यायालयाने दिव्या शिंदेला ३० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी दिल्याने तपासाला आता वेग येण्याची शक्यता आहे.

# 'ध्वनिवर्धकांना २४ तास बंदी घाला!' विद्यानंद बापटांचा एल्गार!

पिंपरी | प्रतिनिधी

**ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावरून विद्यानंद बापट यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत सार्वजनिक ठिकाणी ध्वनिवर्धकांवर केवळ रात्रीच्या वेळेतच नव्हे, तर २४ तास बंदी असावी, अशी ठाम मागणी केली. 'मोठा आवाज येतो म्हणूनच त्या उपकरणाला लाऊडस्पीकर म्हटले जाते. सार्वजनिक सण-उत्सवांच्या नावाखाली खुल्या वातावरणात ध्वनिवर्धक वाजवण्याची परवानगी देता कामा नये. शांततेत जगणे हा माणसाचा मूलभूत अधिकार आहे,' असे बापट यांनी स्पष्टपणे सांगितले.**




मधुरजग फाउंडेशन, ब्राइट्स सोसायटी आणि विचारवेध यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'आवाज शांततेचा' या कार्यक्रमात विद्यानंद बापट यांचा ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अभिनेत्री चिन्मयी सुमित, अभिनेते सुमित राघवन, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी आणि कुमार नागे उपस्थित होते. या कार्यक्रमात ध्वनिप्रदूषण, नागरिकांचा शांततेचा अधिकार आणि सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या त्रासाच्या मुद्द्यावर विविध मान्यवरांनी भूमिका मांडली.

बापट म्हणाले की, 'रात्री बारा ते पहाटे सहा एवढ्याच वेळेसाठी ध्वनिवर्धकांवर निर्बंध असणे पुरेसे नाही. सार्वजनिक ठिकाणी २४ तास ध्वनिवर्धकांवर बंदी असली पाहिजे.' मोठ्या आवाजामुळे नागरिकांना होणारा त्रास हा केवळ काही तासांचा प्रश्न नसून त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा मुद्दा आहे, असे त्यांनी नमूद केले.

सण-उत्सवांच्या नावाखाली ध्वनिवर्धक आणि मोठ्या आवाजाला समर्थन देण्यावरही बापट यांनी आक्षेप घेतला. 'उत्सवखोरांचे प्रबोधन करणे हा मूर्खपणा ठरेल,' अशी परखड टिप्पणी करत त्यांनी आवाजाच्या अतिरेकावर भाष्य केले. 'हजार कावळे कावकाव करत असतील तर कोकिळेचे कूजन ऐकू येणारच नाही,' असे उदाहरण देत त्यांनी वाढत्या ध्वनिप्रदूषणामुळे शांततेचा आवाजच दाबला जात असल्याचे सांगितले.

पुण्याच्या पेठांमधील नागरिकांच्या परिस्थितीवर भाष्य करताना बापट म्हणाले, 'सध्या पेठांमध्ये राहणे ही एक शिक्षा झाली आहे. सणांच्या काळात तर हे आणखी अवघड होत असेल तर उत्सवखोरांना शिक्षा झाली पाहिजे; पण इथे शिक्षा सामान्य माणसांना होते.' शांतता आणि निर्भयपणे जगणे हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ध्वनिप्रदूषणासोबतच रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. ध्वनिप्रदूषण आणि रहदारीस अडथळा यांचे कोणतेही तार्किक समर्थन करता येत नाही, असे बापट यांनी सांगितले. 'लाउडस्पीकर हा उत्सवाचा अविभाज्य भाग कधीच नव्हता. मग त्यासाठी धर्माची ढाल पुढे केली जाते. प्रथा-परंपरा म्हणून कोणत्याही गोष्टी कायम सुरू ठेवता येत नाहीत. वैज्ञानिक दृष्टिकोन हा ऐहिक समस्या सोडवण्यासाठी उपयोगी ठरतो,' असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांनीही बापट यांच्या भूमिकेला पाठिंबा देत त्यांच्या नागरिक म्हणून सुरू असलेल्या संघर्षाचे कौतुक केले. ध्वनिप्रदूषण आणि त्याचा सामान्य नागरिकांना होणारा त्रास याबाबत बापट यांनी सातत्याने भाष्य केले असून, त्याचा परिणाम म्हणून मुंबई उच्च न्यायालयानेही या विषयाकडे लक्ष दिल्याचे पालेकर यांनी सांगितले. बापट यांनी आपल्या भूमिकेचा सातत्याने पुनरुच्चार करत राहणे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

'विद्यानंदचे काम हा नागरिकाने व्यवस्थेविरुद्ध केलेल्या संघर्षाचे प्रतिनिधित्व करते. संघर्ष करण्याची तयारी प्रत्येकाने ठेवली पाहिजे,' असे पालेकर म्हणाले. केवळ ध्वनिप्रदूषणच नव्हे, तर नदीपात्रातील अतिक्रमण, पादचारी मार्गांवरील अतिक्रमण, रस्त्यांची दुरुस्ती आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या प्रश्नांवरही नागरिकांनी वैयक्तिक पातळीवर विरोध केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

अभिनेत्री चिन्मयी सुमित यांनी समाजात वाढत चाललेल्या अविवेकी गोंधळाच्या पार्श्वभूमीवर काहीतरी करण्याची गरज असल्याचे सांगितले. 'माझी पिढी विचारच करत बसली. विद्यानंद आपल्या भूमिकेपासून ढळत नाही,' असे म्हणत त्यांनी बापट यांच्या सातत्याचे कौतुक केले.